# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०१/०६/२०२४ (शनिवार) सकाळ


---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतूक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

दिनांक ३१/०५/२०२४ रोजी चे २०.५० वा. ते २१.३० वा. दरम्यान पो. स्टे. मौदा हद्दीत स्टाफसह अवैध गोवंश वाहतूकीस आळा घालणेकरिता पेट्रोलिंग करीत असताना एक **गाडी क्र. एम एच –३२ क्यू – ००२५** मधून अवैधरित्या निर्दयतेने गोवंश जनावरांची वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्याने मौजा माथनी तारसा रोड केसलापूर येथे नाकाबंदी दरम्यान पिकअप गाडीला थांबवून पाहणी केली असता **गाडी क्र. एम एच –३२ क्यू – ००२५** मध्ये ०७ गोवंशिय जनावरे अत्यंत निर्दयतेने कोंबून व जनावरांची चारापाण्याची कोणतीही व्यवस्था न करता कत्तली करिता घेऊन जातांना मिळून आल्याने पिकअप चालक यास ताब्यात घेऊन त्यांचे ताब्यातून ०७ गोवंशिय जनावरे किंमती **४९,०००/– रूपये** व पिकअप गाडी क्र. एम एच –३२ क्यू – ००२५ किंमती ४,००,०००/– रूपये असा एकुण ४,४९,०००/– रूपयेचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून **आरोपी नामे– सैलेश कवळूजी रंगारी वय २८ वर्ष रा. चापेगडी. ता कुही जि. नागपूर** यांचे विरूद्ध कलम ११(१) (ड) प्रा. छळ प्रति. अधि. १९६० सहकलम ५ अ (१), ९ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधि. १९७६ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक श्री. हर्ष पोद्दार, मा अपर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ, मा. उपविभागीय पो. अधिकारी कामठी विभाग यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन मौदा येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक सतीशसिंह राजपूत, सपोनि निलेश डोर्लीकर, पोहवा नागेश वाघाडे, पोहवा अनिल कोकोडे, पोशि हटवार, पोशि प्रदीप खिल्लारे, विनोद बडगे यांनी केलेली आहे.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर